Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# पाकिस्तान निर्मितीबाबत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार

**मनिष आत्माराम अवसरमोल**
संशोधक विद्यार्थी
awasarmolmanish789@gmail.com

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपण भारतीय घटनेचे शिल्पकार, इतिहास लेखक, धर्मचिंतन, अर्थशास्त्रज्ञ, कामगार व दलित चळवळीचे नेते, कायदेतज्ञ, पत्रकार या भूमिकेमध्ये त्यांचे विचार अभ्यासलेले आहेत. मात्र त्यांच्या या विचारांबरोबरच भारताची होऊ घातलेली फाळणी व स्वतंत्रपणे निर्माण होणारे पाकिस्तान हे राष्ट्र याविषयी त्यांचे विचार समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. भारत स्वतंत्र कसा झाला हे आपणाला माहिती आहे. परंतु स्वतंत्र भारत कसा असावा? त्यांचे पुढे भवितव्य काय असेल? या भारतात समतापूर्ण समाज हा कसा असेल? हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या पाकिस्तान विषयक विचारांमध्ये मांडलेला आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांचे पाकिस्तान विषय विचार मांडताना 1940 मध्ये 'Thoughts on Pakistan' हा ग्रंथ प्रकाशित केला या ग्रंथामध्ये पाकिस्तान विषयीचे विचार त्यांनी स्पष्ट केलेले आहेत. भारताच्या फाळणी वरून संपूर्ण देशात अस्थिरता होती. या ग्रंथाने या समस्येचे योग्य समाधान प्रस्तुत करण्याच्या दिशेने आपली महत्त्वाची भूमिका बजावली. या ग्रंथाची दुसरी आवृत्ती 1945 ला 'Pakistan or Partition of India' हा ग्रंथ प्रकाशित करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पाकिस्तान संदर्भातील विचार समजून घेणे सदर शोधनिबंधाचे हेतू आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे -

1. पाकिस्तान निर्मितीच्या पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टीकोनातून पाकिस्तान या नवीन राष्ट्राची संकल्पना समजून घेणे.
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पाकिस्तान निर्मिती विषय विचारांचे आकलन करणे.
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित पाकिस्तान विषयक ग्रंथाचे आकलन करणे.
5. सद्यस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पाकिस्तान विषयक विचारांची उपयुक्तता पडताळणे.

## संशोधनाची गृहितके -

1. इंग्रजांच्या मुस्लिम विरोधी धोरणामुळे आणि फूट नितीमुळे पाकिस्तान निर्मितीचा विचार तत्कालिन नेत्यांच्या मनात निर्माण झाला.
2. पाकिस्तान निर्मितीसाठी डॉ. बाबासाहेबांनी हिंदु राष्ट्र या संकल्पनेला विरोध केलेला आहे.
3. भारत - पाकिस्तान या देशातील समस्येच्या सोडवणुकीच्या दृष्टिकोनातून डॉ. बाबासाहेबांची भूमिका महत्त्वाची आहेत.
4. सद्यस्थितीत भारत - पाकिस्तान तणाव, कश्मीर समस्या, दहशतवाद यासारख्या समस्या पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे महत्त्व लक्षात येते.

**पाकिस्तान निर्मितीची पार्श्वभूमी -**

इतिहास काळात हिंदू व मुस्लिम यांच्यात अलगतेची भावना निर्माण झालेली नव्हती. ब्रिटिश सत्तेची स्थापना होण्यापूर्वी मुस्लिम जातीयवादाचा उदय झाला नव्हता. भारतातील काही मुस्लिम नेत्यांनी द्विराष्ट्रवादाच्या आधारे मुस्लिमांसाठी स्वतंत्र राष्ट्राची मागणी केली. पाकिस्तान निर्मितीस ब्रिटिशांचे मुस्लिमविषयक धोरण कारणीभूत असल्याचे दिसून येते. सन 1857 नंतर ब्रिटिशांनी मुस्लिमांबाबत कडक धोरणाचा अवलंब केला. सन 1885 मध्ये "भारतीय राष्ट्रीय काँग्रेस"ची स्थापना झाल्यानंतर राष्ट्रवादी विचारांना चालना मिळाली. भारतीय राष्ट्रीय सभेत हिंदू धर्मीयांची संख्या जास्त होती. तेव्हा ब्रिटिशांनी मुस्लीमांबाबत धोरण बदलून मुस्लिमांना जवळ केले. मुस्लिमांच्या मनात हिंदू विषयी कटूतेची बिजे पेरण्यास सुरुवात केली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हिंदुंची संघटना असल्यामुळे हिंदू धर्मीयांच्या हिताचाच विचार करणार आणि मुस्लिमांवर अन्याय करतील. अशी भावना मुस्लिमांच्या मनात निर्माण केली. या भावनेने सर सय्यद अहमद खान ही बळी पडले आणि त्यांनी हिंदू विरोधी भूमिका घेतली व ब्रिटिश धार्जिणे बनवले.

मुस्लिमांच्या जातीवादाच्या उदयाची पार्श्वभूमी पाहता हिंदूच्या तुलनेत मुस्लिमांमध्ये शिक्षणाचे प्रमाण अल्प होते. बुद्धिवादी मध्यम वर्गाचे नेतृत्व नष्ट झाल्याने अशिक्षित असंख्य मुस्लिम हितसंबंधी काही स्वार्थी नेत्यांच्या हातचे बाहुले बनले. या विचारांनेच सन 1906 ला "मुस्लिम लीग"ची स्थापना झाली. त्यामुळे दोन्ही धर्मातील जातीयवाद्यांनी आग्रहाची भूमिका घेतली. दोन्ही धर्मीयांमध्ये परस्परांविषयी अविश्वासाचे वातावरण निर्माण होऊन पुढील काळात ते वाढतच गेले. याला ब्रिटीश राज्यकर्त्यांची भेदनिती कारणीभूत झाली होती. धर्म व संस्कृती या दोन्ही बाबतीत मुसलमान हिंदूंपेक्षा वेगळे आहेत. हिंदूधर्मीय बहुमताच्या जोरावर मुस्लिमांवर अन्याय करेल. म्हणून ब्रिटिश गेल्यावर मुस्लिमांसाठी वेगळे राष्ट्र असणे गरजेचे आहेत; असे मत सन 1930 मध्ये मुस्लिम लीगच्या अलाहाबाद येथील अधिवेशनात अध्यक्षीय भाषणात मोहम्मद इकबाल यांनी मांडले. तर सन 1933 मध्ये चौधरी मोहम्मद अली या लंडनमध्ये शिकणाऱ्या भारतीय विद्यार्थ्याने सर्वप्रथम 'पाकिस्तान' ही स्वतंत्र मुस्लीम राष्ट्र विषय संकल्पना मांडली. पाकिस्तान हा शब्द पंजाब, अफगाणिस्तान (सरहद्द प्रांत), कश्मीर, सिंध व बलुचिस्थान यापासून तयार झाला. त्याचा अर्थ 'पवित्र भूमी' असा होतो.

सन 1937 नंतर पाकिस्तानच्या मागणीला जोर चढू लागला. सन 1940 मध्ये मुस्लिम लिगच्या अधिवेशनात पाकिस्तानच्या मागणीचा ठराव अधिकृतरित्या संमत करण्यात आला. सन 1942 मध्ये ब्रिटिश सरकारविरुद्ध 'चले जाव आंदोलन' सुरू असतानाच बॅ. जीनाने आडमुठे धोरण स्विकारून ब्रिटिश सरकारला पाठिंबा दिला. तटजोडीचे सर्व प्रयत्न हाणून पाडून दि. 16 ऑगस्ट 1942 ला 'प्रत्यक्ष कृती दिन' घोषित केला. या दिवसापासून प्रचंड हिंसाचार व दंगलींना सुरुवात झाली. यामध्ये अनेक निरपराध हिंदु-मुस्लिम मारले गेले. या अराजकतेच्या पार्श्वभूमीवर शांततेचे सर्व प्रयत्न अयशस्वी ठरून दि. 14 ऑगस्ट 1947 ला 'स्वतंत्र पाकिस्तानची निर्मिती' झाली.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पाकिस्तान विषयी विचार ग्रंथ -**

मुस्लिम लीगने मार्च 1940 मध्ये लाहोर अधिवेशनात पाकिस्तानच्या मागणीचा ठराव मंजूर केल्यानंतर नऊ महिन्यातच डॉ. बाबासाहेबांनी 'पाकिस्तान विषयक विचार' ग्रंथ प्रकाशित करून या ग्रंथाचे दुसरी आवृत्ती 1945 मध्ये प्रकाशित केली. हा ग्रंथ जेव्हा प्रकाशित झाला तेव्हा त्याने अनेकांना धक्का दिला. हा ग्रंथ मुस्लिमांनी स्वीकारला नाही आणि हिंदूंनी तर नाकारलाच. डॉ. बाबासाहेब

आंबेडकर या ग्रंथांमध्ये म्हणतात फाळणी एका राष्ट्राची होते. पण हिंदुस्तान हे एक राष्ट्र आहे, ही कल्पनाच भ्रामक आल्याचे मत व्यक्त करतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या 'Thoughts on Pakistan' या ग्रंथात फाळणीचे दुष्परिणाम दाखवून देताना सांप्रदायिकता व त्यातून निर्माण होणारी हिंसा ही दाखवून देतात. 'Pakistan or Partition of India' या ग्रंथात बाबासाहेब भारताचे संविधान तयार करण्याआधी पाकिस्तानच्या प्रश्नाला सोडविण्यास प्राधान्य देतात. पाकिस्तानचा प्रश्न सुटल्यावरच आपण एक शक्तिशाली संविधान बनवू शकतो असे ते म्हणतात. भारतातील मुसलमान एककेंद्रीय शासनाला विरोध करत आहेत हे त्यांनी दाखवून दिले. बाबासाहेबांनी या ग्रंथामधून भारत विभाजनाला पूर्णपणे कॉंग्रेसला जबाबदार धरले आहे. डॉ. बाबासाहेब सांगतात की, कॅनडा, स्विझरलँडमधील तसेच दक्षिण आफ्रिका या ठिकाणी भिन्न वर्ग, संस्कृती असून फाळणी झाली नाही त्याप्रकारे भारतात फाळणी का? या प्रकारे त्यांनी वेगळ्या पद्धतीने विरोध देखील केला आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात की, "Give the experience of the French and the Italian in Switzerland, the question that arise are, why should it be otherwise in India?" डॉ. बाबासाहेबांनी असा प्रश्न उपस्थित केला. मुस्लिम नेत्यांना भीती वाटत आहे की हिंदू बरोबर राहिलो तर दडपले जाऊ आपली संस्कृती नष्ट होते की काय हा भ्रम त्यांच्यात आहे असे त्या ग्रंथांमधून सांगतात.

**पाकिस्तान निर्मितीबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाकिस्तान निर्मितीचे विचार मांडताना म्हणतात, सन 1920 साली मोपला विद्रोह झाला त्यात हिंदू-मुस्लिम दंगल घडून आली. 1922 मध्ये पश्चिम बंगाल, पंजाब येथील मोहरम सेलिब्रेशनमध्येही हिंदू मुस्लिम दंगल झाली. 1924 ते 26 मध्ये देखील हिंदू-मुस्लीमात ताणलेले संबंध ते स्पष्ट करतात 1920 ते 40 पर्यंतचा दंगलग्रस्त इतिहास दाखवून बाबासाहेब हिंदू-मुस्लिमामध्ये असलेला एकीचा अभाव स्पष्ट करतात. सामाजिक संघटनाशिवाय राजकीय एकता मिळणे अवघड आहेत. जर ते साध्य केले तर उन्हाळ्याच्या रोपटे प्रमाणे ते अनिश्चित असेल परंतु प्रतिकूल वाऱ्याच्या वासरामुळे ते उपटून जाईल. केवळ राजकीय ऐक्यामुळे भारत राज्य असेल मात्र एक राज्य म्हणजे राष्ट्र नसते. राष्ट्र नसलेले असे राज्य अस्तित्वाच्या संघर्ष टिकून राहण्याची शक्यता कमी असते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, "मिश्र आणि संयुक्त राज्यासाठी धोका बाह्य आक्रमकतेस तितकासा नाही, जितका देशाच्या अंतर्गत पुनरूत्थानामध्ये जो खंडित मोहित व धडकला गेला आहे आणि त्याच्या इच्छेविरुद्ध आहे. ज्यांनी पाकिस्तानला विरोध केला त्यांनी फक्त हा धोका ध्यानात घेऊ नये. परंतु हे देखील लक्षात घेतले पाहिजे की दडपल्या गेलेल्या राष्ट्रीयतेच्या संमिश्र राज्यात व्यत्यय आणण्यासाठी आणि स्वतःसाठी स्वतंत्र घर, मिळवण्याच्या या प्रयत्नाचा निषेध करणे तत्त्वातून चित्र सिद्ध होते", म्हणजेच बाबासाहेबांनी स्व-इच्छेला महत्त्व दिले. बहुसंख्य मुस्लिमांची इच्छा ही पाकिस्तान निर्माण व्हावा ही असेल तर त्यांची इच्छा पूर्ण करावी असे ते स्पष्ट करतात.

सन 1955 मध्ये फाळणीनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, "पाकिस्तान पासून भारत वेगळा झाला याचा मला आनंद झाला होता. तसे पाहता मीच पाकिस्तानचा तत्त्वज्ञ होतो. मी फाळणीचे समर्थन केले ते यासाठी की फाळणीमुळे केवळ हिंदू स्वतंत्रच नव्हे तर मुक्त होऊ शकणार होते. जर भारत अखंड राहिला असता तर हिंदूंना मुस्लिमांच्या दयेवर जगावे लागणार होते. जर फाळणी झाली नसती तर अखंड भारतात एकाच देशात दोन राज्याचे सरकार अस्तित्वात आले असते आणि या दोन राष्ट्रांपैकी मुसलमान ही निश्चितच शासनकर्ती जमात बनली असती."

## निष्कर्ष -

देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने फाळणी झाली तर ते भारताच्या हिताचे आहेत ही बाब डॉ.बाबासाहेबांनी दाखवून दिली आहे. फाळणी झाली तर भारत व पाकिस्तान या राष्ट्रा समोर नवीन समस्या राहतील हे देखील त्यांनी स्पष्ट केले. डॉ. बाबासाहेब म्हणतात की, लाहोर अधिवेशनात मुस्लिम लीगने पाकिस्तानच्या निर्मितीचा ठराव मान्य केला तेव्हाच त्यांची पाकिस्तान निर्मितीची संकल्पना स्पष्ट होती. मुस्लिमांची हिंदू प्रती असलेली भीती ही प्रामुख्याने फाळणीला कारणीभूत आहे. मुसलमानांची इच्छा असेल तर बाबासाहेबांनी पाकिस्तान त्यांना देऊन टाकावा हेदेखील सुचविले आहेत. देशाच्या हितासाठी व सुरक्षिततेसाठी त्यांनी फाळणीची गोष्ट मान्य केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी फाळणीनंतर येथील सर्व मुस्लीम तिकडे व तिथल्या हिंदूंना इकडे येणे यावर भर दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या 'Thoughts on Pakistan' आणि 'Pakistan or Partition of India' हे ग्रंथ त्यांचे पाकिस्तान विषयक विचार समजून घेण्यासाठी उपयुक्त आहेत. सद्यस्थितीमध्ये भारत-पाकिस्तान संबंध पाहता त्यांच्यातील तनाव, जम्मू कश्मीर समस्या, दहशतवाद यासारख्या समस्यांच्या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना परिस्थितीची वास्तविकता आणि पर्यायाची उपलब्धता याचे मार्गदर्शन होते.

## संदर्भ ग्रंथ -

1. Ambedkar B. R. - "Thoughts on Pakistan", Thacker and Company Limited, Bombay, 1941.
2. Ambedkar B. R. - "Pakistan or The Partition of India", Thacker Publishers, Bombay, 1945.
3. कसबे, रावसाहेब - "आंबेडकर आणि मार्क्स" सुगावा प्रकाशन, पुणे 1985.
4. खैरमोडे, चां. म. - "डॉ. भीमराव व रामजी आंबेडकर" खंड 6, सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ पुणे, दुसरी आवृत्ती 1988.
5. खैरमोडे, चां. म. - "डॉ. भीमराव व रामजी आंबेडकर" (खंड 11), सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती जुलै 1990.
6. जाधव विजय, - "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र", मनोरमा प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती ऑगस्ट - 2007.
7. जाधव, डॉ. नरेंद्र ,- "बोल महामानवांचे (खंडक्षेत्र)", ग्रंथाली प्रकाशन, मुंबई 2012.
8. पाटील, डॉ. वा. भा. - "भारताचे परराष्ट्रीय धोरण", प्रशांत पब्लिकेशन, जळगाव. प्रथमावृत्ती, 21 एप्रिल 2015.
9. रघुवंशी, रमेश - "डॉ. आंबेडकरांची भाषणे", सुगावा प्रकाशन, पुणे 1980.
10. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लेखन आणि भाषणे, (खंड 1 ते 22), महाराष्ट्र शासन, 1989.
11. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, प्रथमावृत्ती, 25 डिसेंबर 1993.